MHSN090004282024

**नियमित दिवाणी दावा क्र. ४२/२०२४ मधील नि.क्र.१६ खालील आदेश.**

(०१). प्रस्तुत प्रतिवादी हिने सदरचा अर्ज तीचेविरुध्द 'विना कैफियत' असा झालेला आदेश बाजूला सारुन/रद्द होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादीचे कथन असे की, तीची तब्येत ठीक नसल्याने ती मे. न्यायालयात नेमले तारखेस हजर राहु शकली नाही. त्यामुळे दिनांक ११/११/२०२४ रोजी तिचेविरुध्द विनाकैफियत असा आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

(०२). वादी यांनी नि. क्र.१८ कडे त्यांचे म्हणणे दाखल केले असुन, प्रतिवादी हिचा अर्ज त्यांना मान्य व कबुल नसल्याचे कथन केले आहे. वादी यांचे कथन असे की, प्रतिवादीस दाव्याचे समन्स बजावणी झाल्यानंतर ती वकीलांचेमार्फत हजर झालेली आहे. परंतू तीने वेळेत कैफियत दाखल केलेली नाही. तसेच कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाबाबत कोणतेही योग्य व संयुक्तिक कारण दिलेले नाही. त्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करावा व यदाकदाचित मे. न्यायालय प्रतिवादीचा अर्ज मंजूर करणेच्या निर्णयाप्रत आल्यास प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करण्यात यावा.

**(०३).** अभिलेख पाहिले. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपाकरीता व पृथ्थक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदरकामी प्रतिवादी हीस तीची कैफियत दाखल करणेकरीता एक महिन्याचा विलंब झाल्याचे दिसुन येते. तथापि, सदर दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होणेकरीता प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित होईल. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**01.** प्रतिवादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**02.** प्रतिवादीचेविरुध्द झालेला 'विना कैफियत आदेश' रद्द रक्कम रुपये १००/– दंडावर मंजूर करण्यात येतो.

**03.** प्रतिवादी हीने दंडाची रक्कम वादीस दिल्यानंतर प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेण्यात यावी.

RITA SHESHRAO KULKARNI
Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2025.02.11 17:08:23 +0530

**तासगांव** (डॉ.आर.एस.कुळकर्णी)
दिनांक:११ फेब्रुवारी २०२५ प्र.२ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर,
**तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – ११ फेब्रुवारी २०२५

न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक – ११ फेब्रुवारी २०२५

आदेश अपलोड दिनांक– ११ फेब्रुवारी २०२५